राज्य शासन, महानगरपालिका, नगरपालिका व अंतर जिल्हा परिषदांमधील विवाहीत स्त्री-कर्मचा-यांची जिल्हा परिषदेच्या जिल्हा सेवांत बदलीने नेमणूक करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्रमांक एपीटी - १०७२-३३७६७-१४०-बी-आर
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. दिनांक ४ जून १९७९.

परिपत्रक :- महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (सेवाभरती) नियम, १९६७ च्या नियम ८(८) मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांना अन्य जिल्हा परिषदेच्या जिल्हा सेवांतील कोणत्याही कर्मचा-यांकडून अर्ज प्राप्त झाल्यावर, दोन्ही जिल्हा परिषदांत परस्पर संमत करण्यात येतील अशा शर्तीवर व अटीवर तसेच, खाली नमूद केलेल्या शर्तीवर अशा कर्मचा-यांस उच्च जिल्हा परिषदेतील ज्या जिल्हा सेवेत त्याने जे पद धारण केले असेल त्या जिल्हा सेवेतील पदावर नेमता येते :-

एक) उपरोक्त प्रकारे करण्यात यावयाच्या नेमणुका पदोन्नतीसाठी राखून ठेवलेल्या पदावर करता येणार नाहीत. सदर नेमणुका फक्त नामनिर्देशनाने भरण्यासाठी राखून ठेवलेल्या पदावरच करण्यांत येतील.

दोन) अशाप्रकारे नेमणुका केल्यानंतर, नेमण्यांत आलेला कर्मचारी संबंधित संवर्गासाठी तयार करण्यांत आलेल्या कर्मचा-यांच्या ज्येष्ठता क्रमसूचीत कनिष्ठतम म्हणून गणला जाईल.

अशा प्रकारची तरतूद राज्य शासन, महानगरपालिका अथवा नगरपालिकांमधून जिल्हा परिषद सेवेत प्रविष्ठ होणा-या विवाहीत स्त्री-कर्मचा-यांबाबत उपरोक्त नियमाच्या नियम ८(९) नुसार करण्यांत आलेली आहे.

२. उपरोक्त प्रकारे बदलीने नेमणुका करतांना, जिल्हा परिषदेने मुख्य कार्यकारी अधिकारी, इतर अटीसमवेत जर राज्य शासन, महानगरपालिका, नगरपालिका व अन्य जिल्हा परिषदा यामधून येणा-या कर्मचा-यांऐवजी संबंधित जिल्हा परिषदेकडील कर्मचारी राज्य शासन, महानगरपालिका नगरपालिका व अन्य जिल्हा परिषदा यांच्याकडे जाण्यास तयार असेल तरच अशा बदलीने नेमणुका करण्यास संमति दर्शवितात असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. जिल्हा परिषदेच्या जिल्हा सेवेतील ज्या पदांवर संबंधित उपरोक्त संस्थेकडून येणा-या कर्मचा-यांची बदलीने नेमणूक करावयाची आहे ते पद नामनिर्देशनाने नेमणुका करण्यासाठी राखून ठेवले असेल आणि ते रिक्त असेल तर परस्पर बदलीची अट घालणे संयुक्तीक होणार नाही. अशा अटीचा आग्रह धरल्यास ज्या हेतूने विवाहीत स्त्री-कर्मचा-यांची बदलीने नेमणुका करण्याबाबत नियमात

करुन तरतूद करण्यात आली आहे तो हेतू असफल होण्याची शक्यता आहे. तेव्हा अशा रितीने विवाहीत स्त्री कर्मचाऱ्यांची एका जिल्हा परिषदेतून अथवा नगरपरिषदा महानगरपालिका व राज्य शासन * यातून बदलीने नेमणूक करतांना ज्या जिल्हा परिषदेस स्त्री विवाहीत कर्मचाऱ्यांची नेमणूक करावयाची असेल त्या जिल्हा परिषदेच्या जिल्हा सेवेत नामनिर्देशनाने राखून ठेवलेल्या पदांपैकी एखादे पद रिक्त असल्यास *उपरोक्त अट न घालता जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी बदलीने नेमणूक करावी। व तसे करणेच शासनाच्या धोरणानुसार योग्य ठरेल.

महाराष्ट्राचे राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

सही/-

(पांडुरंग राव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व विभागीय आयुक्त
सर्व मंत्रालयीन विभाग.

सत्य प्रत

~~स्थायी आदेश संचिकेत समाविष्ट केले आहे~~

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, ~~ठाणे~~